Estd. 1962
NAAC'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## प रि प त्र क

**विषय -** **कार्यालयीन उपस्थितीबाबत**

**संदर्भ-** १. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. आस्थापना जा. क्र.१२३६ / दि.३१ जूलै, २०२० व त्यामधील संदर्भ क्र. १ ते ११ पत्र व परिपत्रक

२. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक ३१ ऑगस्ट,२०२०.

३. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय जा. क्र. नैआ/कोरोना विषाणू आरआर /७५५/२०२० दिनांक ३१ ऑगस्ट,२०२०.

४. शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३ दि. १८ सप्टेंबर, २०२०

सर्व संबधिताना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या/ अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्यात येत असल्याने उपरोक्त संदर्भ क्र. ४ मधील शासन निर्णयानुसार खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या/ अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्यात येत असल्याने विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची यापुढे निर्धारित वेळेनूसार १००% उपस्थिती राहिल.

२. उपस्थित सर्व कर्मचारी यांनी शासनाने व विद्यापीठाने वेळोवेळी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. (सोबत परिशिष्ट -१ माहितीसाठी)

**(डॉ. विलास द. नांदवडेकर)**
कुलसचिव

**जा.क्र. आस्थापना/** १३९८
**दि.** 18 SEP 2020
**प्रति,**

१) संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य / संचालक
२) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
३) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

परिशिष्ठ - १

कोव्हीड १९ विषाणू व्यवस्थापनाबाबत राष्ट्रीय दिशानिर्देश

१. सर्व नागरिकांना सार्वजनिक तसेच कामाच्या ठिकाणी मास्क, चेहरा झाकावयाचे साधन वापरणे बंधनकारक असेल.

२. सर्व सार्वजनिक ठिकाणी तसेच वाहतुकीदरम्यान सर्व नागरिकांनी सामाजिक अंतराचा निकष पाळणे बंधनकारक असेल. दुकानामध्ये/ दुकान परिसरामध्ये ५ पेक्षा जास्त व्यक्ती / गिऱ्हाईक यांना प्रतिबंध असेल तसेच उपस्थित असलेल्या व्यक्ती / गिऱ्हाईकां मध्ये ६ फुटापेक्षा जास्त अंतर राखणे बंधनकारक असेल.

३. विवाह कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त ५० नातेवाईक / नागरिक यांना सामाजिक अंतराचे निकष पाळून हजर राहणेस परवानगी असेल.

४. अंत्यसंस्कारासाठी जास्तीत जास्त २० नातेवाईक / नागरिक यांना सामाजिक अंतराचे निकष पाळून हजर राहणेस परवानगी असेल.

५. राज्य तसेच स्थानिक प्राधिकरणाव्दारे करणेत आलेल्या नियमानूसार तसेच कायद्यामध्ये नमूद असलेल्या तरतूदीनूसार सार्वजनिक ठिकाणी तसेच कामाच्या ठिकाणी थुंकणे हे दंडनिय असेल.

६. सार्वजनिक ठिकाणी दारू, पान, तंबाखू, तंबाखूजन्य पदार्थ खाण्यास व थूंकण्यास परवानगी असणार नाही.

कामाच्या ठिकाणाबाबत अतिरिक्त दिशानिर्देश

८. कार्यालये/ आस्थापनामधील सर्व प्रवेश व बाहेर पडणेच्या ठिकाणी तसेच कार्यालयातील सार्वजनिक ठिकाणी थर्मल स्कॅनिंग/ हॅंड वॉश/ सॅनिटायझर हे उपलब्ध करून देणे.

९. कामाच्या ठिकाणीअसलेल्या सार्वजनिक वापराचे ठिकाणे तसेच सर्व गोष्टी ज्या मानवी संपर्कामध्ये उदा. दरवाज्याचे हॅण्डल, इत्यादी तसेच सतत हाताळली जाणाऱ्या बाबींची पुन्हा पुन्हा निर्जंतुकीकरण करणे यावे.

१०. कामाच्या ठिकाणी सर्व नागरिकांनी कामागारामधील पुरेसे अंतर, कामाच्या वेळादरम्यान पुरेसे अंतर त्याचबरोबर कर्मचाऱ्यांच्या जेवणाच्या वेळामध्ये सामाजिक अंतराचा निकष पाळला जावा.

Scanned by CamScanner

Estd. 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

**विषय -** **कोव्हीड -१९ साथ उद्रेक कालावधीमध्ये कार्यालयाबाबत मार्गदर्शक सूचना....**

**संदर्भ-** १. विद्यापीट परिपत्रक जा.क्र. आस्थापना /९७७ दि.६ जून,२०२०.
२. महाराष्ट्र शासन सार्वजिनक आरोग्य विभाग पत्र क्र. न्यायीक२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.३० मे,२०२०
३. जिल्हाअधिकारी कार्यालय, कोल्हापूर, राजशिष्टाचार विभाग क्र. कार्या.२/राशि/ आरआर- २०२० दि. ३१/५/२०२०

उपरोक्त विषयसंदर्भीय पत्रासअनुसरुन सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचनानुसार विद्यापीठ कार्यालय टप्या टप्याने कार्यरत होत आहेत. नजीकच्या कालावधीमध्ये कार्यालयामधील कर्मचाऱ्यांची आणि अभ्यागतांची संख्या वाढणार आहे. कार्यालयामध्ये वर्दळ वाढल्यामुळे कोव्हीड- १९ विषाणूचा प्रसार होवू नये यासाठी उपरोक्त संदर्भ क्र. २ व ३ नूसार मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर सूचनांची अंमलबजावणी करणेबाबत महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग व जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांनी कळविलेले आहे. त्यास अनुसरुन खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. उपरोक्त संदर्भीय क. २ अन्वये प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचनेनूसार अवलंब करावे, त्यामध्ये कोणत्याही प्रकारे दुर्लक्ष अथवा कसुर होणार नाही दक्षता घ्यावी. **(मार्गदर्शक सूचनाची प्रत सोबत जोडलेली आहे.)**

२. सर्व अधिविभाग / प्रशासकीय विभागप्रमुख यांनी आपल्या विभागासाठी ७० % अल्कोहोल असलेले सॅनिटायझर, २ % सोडियम हायपोक्लोराईट सोल्युशन, आवश्यकतेनूसार सॅनिटायझेशन मशिन व विभागातील शिक्षक, अधिकारी, व कर्मचारी यांचेसाठी तीन पदरी मास्कच्या (Wildcraft) प्रत्येकी तीन नग विद्यापीटाच्या अकौंट कोडनुसार आपल्या विभागाच्या लेखाशिर्षामधून खरेदी करण्यात यावेत.

३. सर्व अधिविभाग / प्रशासकीय विभागप्रमुख अभ्यागंताना प्रवेश देताना कोणत्या बाबी निकडीच्या आहेत, तसेच शासन सूचनेनुसार आपल्या विभागाची कार्यपध्दती निश्चित करुन त्यानूसार सूचना / नियमावली तयार करुन प्रसिध्द करण्यात यावी. त्याची प्रत मा. कुलसचिव कार्यालय, सुरक्षा विभाग व आस्थापना विभागास देण्यात यावी.

४. विद्यापीठातील / महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी / विद्यार्थीनी, पालक आणि अभ्यागतांनी आपल्या किंवा विभागाच्या कामाचा पाठपुरावा दुरध्वनी/ इंटरकॉम, इ-मेलव्दारे करावा. कार्यालयीन कामकाजात E-office तसेच बैठकीसाठी व्हिडीओ कॉन्फरन्सचा जास्तीत जास्त वापर करावा. प्रत्यक्ष भेटणे / एकत्रित येणे टाळावे.

५. विद्यापीठामध्ये प्रवेश करताना विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी तसेच महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी आणि अभ्यागतांनी आपले ओखळपत्र सुरक्षा रक्षकास सहजासहजी निदर्शनास येईल असे धारण करुन तोंडाला मास्क लावणे अनिवार्य आहे.

६. विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी तसेच महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी आणि अभ्यागतांनी कार्यालयात येताना-जाताना, काम करत असताना, जेवण करत असताना किंवा सुटटीच्या वेळी एकत्रित जमा होणे टाळावे.

७. सर्व अधिविभाग / प्रशासकीय विभागप्रमुख यांनी सोबतच्या सूचनेनूसार दोन कर्मचारी यांचेमधील किमान तीन फुट अंतर, मास्क वापरणे, वांरवार हात धूणे इ. आवश्यक बाबींची अंमलबजावणी होणेत कसून होणार नाही याची दक्षता घ्यावी.

८. विभागप्रमुख यांनी विभागातील टेबल-खुर्च्या व इतर साहित्य स्वच्छतेबाबतची योग्यती कार्यवाही वर्ग-४ मधील कर्मच्यारींकडून करुन घ्यावी.

९. विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी तसेच महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी आणि अभ्यागतांनी कोव्हीड- १९ विषाणूचा प्रसार होवू नये व आपले आरोग्य सुरक्षित टेवण्यासाठी शासन प्राप्त सूचेनानुसार विद्यापीट प्रशासनाने केलेल्या उपाययोजनेस सहकार्य करावे.

१०. सर्व अधिकारी/ कर्मचारी यांनी शासनाने वेळोवेळी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव

जा.क्र. आस्थापना/ -1000
दि. 12 JUN 2020
प्रति,

१) संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य / संचालक
२) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
३) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यापुढे १०० टक्के उपस्थित राहण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३,**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक: १८ सप्टेंबर, २०२०.

**संदर्भः**-(१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः-समय-२०२०/प्र.क्र.३५/१८ (र. व का.), दिनांक ४ मे, २०२०

(२) शासन आदेश, आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन, क्रमांकः- डीएमयू २०२०/ सीआर ९२/ डीआयएसएम-१, दिनांक ३१ मे, २०२०

(३)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः-समय-२०२०/प्र.क्र.३५/१८ (र. व का.), दिनांक ५ जून, २०२०

(४) शासन आदेश, आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन, क्रमांकः- डीएमयू २०२०/ सीआर ९२/ डीआयएसएम-१, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२०

**प्रस्तावनाः-**

कोव्हिड-१९ या जागतिक महामारीच्या परिस्थितीत संपूर्ण देशात टाळेबंदी घोषित करण्यात आलेली आहे. सदर टाळेबंदीमुळे प्रशासकीय कार्यालयीन कामकाज हे मर्यादीत कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पार पाडण्यात येत आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यासंदर्भात दिनांक ६.०७.२०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनांना आव्हान देणाऱ्या तसेच राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि राज्य सरकार यांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेण्याच्या निर्णयास आव्हान देणाऱ्या विविध रिट याचिका मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या. सदर याचिकांमध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२८ ऑगस्ट, २०२० रोजी निर्णय दिला असून त्यानुसार राज्यात विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या/ अंतिम सत्राच्या परीक्षा घ्यावयाच्या आहेत.

सदर परीक्षेच्या कामकाजाकरिता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. प्रचलित कार्यपध्दतीनुसार परीक्षा पध्दतीमध्ये अनेक प्रक्रियांचा समावेश असून त्यामध्ये प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तरपत्रिका तपासणे, गुणपत्रिका तयार करणे, निकाल घोषित करणे, फेरमूल्यांकन करणे, अशी अनेक कामे समाविष्ट आहेत. सदर परीक्षा दि.१ ऑक्टोबर, २०२० ते दि.३१ ऑक्टोबर,

२०२० या कालावधीत घेऊन त्याचा निकाल नोव्हेंबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यात जाहिर करणे याकरिता मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता आहे. एकंदरीत कमी कालावधीत परीक्षा पार पाडणे व त्याचा निकाल जाहिर करणे हे आव्हानात्मक काम प्राप्त परिस्थितीत पूर्ण करण्यासाठी विद्यापीठे/शैक्षणिक संस्थेच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची यापुढे १०० % उपस्थिती असणे आवश्यक आहे.

**शासन निर्णयः-** उपरोक्त बाब विचारात घेता, या शासन निर्णयान्वये शासन राज्यात विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या/ अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्यात येत असल्याने विद्यापीठे/शैक्षणिक संस्थेच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची यापुढे १०० % उपस्थिती राहिल, असा निर्णय घेत आहे.

२. कोरोना विषाणूंचा प्रसार होऊ नये तसेच कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी यांना त्याचा संसर्ग होऊ नये म्हणून राज्य शासनाच्या तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या आदेशातील सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. यासंदर्भात सर्व संबंधित विद्यापीठांनी/शैक्षणिक संस्थांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२००९१८१६४८१९५६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Pravinkumar
Gulabrao Pawar

Digitally signed by Pravinkumar Gulabrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8de261729f06eda4a56aba947eceb6140d7406426b2f08c9317bea2458ec1f92, serialNumber=8f18625adb482a7ee2512cea93ce697388c95a99c89e41e85c05a3de8476488f, cn=Pravinkumar Gulabrao Pawar
Date: 2020.09.18 16:49:16 +05'30'

**(प्रविणकुमार पवार)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७) मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) मा.सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई
९) मा.कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
१०) मा.कुलगुरु, सर्व अभिमत विद्यापीठे

११) मा.कुलगुरु, सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे
१२) मा.कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड
१३) मा.कुलगुरु, कवि कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर
१४) मा.कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
१५) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, पुणे
१६) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई
१७) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई
१८)निवडनस्ती (विशि-३).

Estd. 1962
NAAC'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

**विषय -** **कार्यालयीन उपस्थितीबाबत**

**संदर्भ-** १. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. आस्थापना जा. क्र.१२३६ / दि.३१ जूलै, २०२० व त्यामधील संदर्भ क्र. १ ते ११ पत्रे व परिपत्रक

२. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक ३१ ऑगस्ट,२०२०.

३. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय जा. क्र. नैआ/कोरोना विषाणू/आरआर /७५५/२०२० दिनांक ३१ ऑगस्ट,२०२०.

सर्व संबधिताना कळविण्यात येते की, सद्या उपरोक्त संदर्भ क्र. २ व ३ अन्वये मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, महाराष्ट्र शासन तसेच जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांचेकडून सुधारीत मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केलेली आहेत. सदर आदेशामध्ये दिलेल्या सुचनाच्या अनुषंगाने अत्यावश्यक सेवा प्रदान करणारी विभाग वगळता विद्यापीठातील अधिविभाग यांच्या शैक्षणिक व प्रशासकिय तसेच प्रशासकीय विभाग यांच्या प्रशासकीय कामकाजाकरिता खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. सर्व पदव्युत्तर अधिविभागातील अध्यापनाचे कामकाज हे ३० सप्टेंबर, २०२० पर्यंत प्रतिबंधीत असेल तथापि ऑनलाईन /दुरस्थ शिक्षणास परवानगी असेल.

२. विद्यापीठातील सर्व वर्ग १ व वर्ग २ मधील कर्मचारी नियमितपणे (१००%) उपस्थित राहतील.

३. सर्व वर्ग १ व वर्ग २ मधील कर्मचारी वगळता उर्वरित सेवकांची ५०% याप्रमाणे सेवकांना आळीपाळीने (Rotation) कार्यालयात बोलावून कार्यालयीन कामकाज करुन घेण्यात यावे. तसेच विभाग प्रमुख यांना उर्वरित सेवकांची सेवा आवश्यक वाटल्यास त्यानूसार त्यांनी संबधित सेवकांना बोलविल्यास त्यांनी कार्यालयात उपस्थित रहावे. याचे नियोजन संबंधित विभाग प्रमुख यांनी करावे. ज्या कर्मचा-यांना कार्यालयात उपस्थित राहणेपासून सूट मिळालेली आहे त्यांनी घरी राहून (Work from Home) कार्यालयीन काम करावे. रजेवर असणाऱ्या या कर्मचाऱ्यांचा यामध्ये समावेश करु नये. उपरोक्त नूसार संबधित विभाग प्रमुख यांनी विभागातील प्रत्येक अधिकारी / सेवक कार्यालयात उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी.

४. अत्यावश्यक सेवा प्रदान करणारी कार्यालये (सुरक्षा विभाग, आरोग्य विभाग, व अभियांत्रिकी विभागअंतर्गत असलेली अत्यावश्यक सेवा) आवश्यकतेनूसार पूर्ण क्षमतेने सुरु राहतील.

५. उपरोक्त प्रमाणे व आवश्यकतेनूसार विभागप्रमुख यांच्या आदेशानुसार सदर कर्मचारी यांनी कार्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य राहिल.

६. विभाग प्रमुख यांनी उपस्थित कर्मचारी यांची उपस्थिती दिवस व कामाचे स्वरुप यांच्या नोंदी (रोस्टर) ठेवण्यात याव्यात.

७. प्रतिबंधित क्षेत्रात निवास असणाऱ्या किंवा अजारी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कार्यालयीन कामकाजाकरिता बोलावू नये. तसेच त्यांना घरी राहून (Work From Home) काम करण्याबाबत सूचना द्याव्यात. मात्र अशा सेवकांनी विभाग प्रमुख यांचेकडे ई-मेलव्दारे कळवावे.

८. उपस्थित सर्व कर्मचारी यांनी शासनाने व विद्यापीठाने वेळोवेळी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. (सोबत परिशिष्ट -१ माहितीसाठी)

९. सदर आदेश पुढील आदेश निर्गमित होई पर्यंत लागू राहतील.

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव

जा.क्र. आस्थापना/ ९३३४
दि. 2 SEP 2020
प्रति,

Estd. 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय -** **कार्यालयीन उपस्थितीबाबत**

**संदर्भ -**
१. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयु २०२०/सीआर.९२/डी एम-१, दिनांक ४ जून,२०२०
२. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. आस्थापना /९७७ दि.०६ जून, २०२०.
३. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. आस्थापना /१००० दि.१२ जून, २०२०.
४. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचे जा. क्र. नेआ/कोरोना विषाणू आरआर/६३५/२०२०, दिनांक १८/०७/२०२०
५. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. आस्थापना /११८९ दि.१९ जुले, २०२०.
६. सामान्य प्रशासन विभाग शा. नि. क्र. समय२०२०/प्र.क्र.४९/१८(र.व.का.) दि.२३/०७/२०२०
७. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचे जा. क्र. नेआ/कोरोना विषाणू आरआर/६४९/२०२०, दिनांक २६/०७/२०२०
८. केंद्रीय गृहसचिव, गृह मंत्रालय, भारत सरकार यांचे क्रमांक ४०-३/२०२०-DM-I (A) दि.२९/०७/२०२० रोजीचे आदेश.
९. मुख्य सचिव महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुबई यांचेकडील No. DMU/२०२०/CR.९२/DisM-१. दि.२९/०७/२०२० रोजीचे आदेश.
१०. जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांचे जा.क्र. नेआ/कोरोना विषाणू/आरआर/६६३/२०२०, दिनांक ३०/०७/२०२० रोजीचे आदेश.
११. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. आस्थापना /१२३५ दि. ३१ जुले, २०२०

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठ उपरोक्त संदर्भ क्र. १० अन्वये मा. जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांचे आदेश व संदर्भ क्र. ९ मुख्य सचिव महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुबई यांचेकडील **No. DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि.२९/०७/२०२०** नुसार कार्यालयीन उपस्थितीबाबत खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. अत्यावश्यक सेवा प्रदान करणारे विभाग वगळता इतर प्रत्येक अधिविभाग / प्रशासकीय विभागातील विभाग प्रमुख यांनी अधिविभाग / विभागातील शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांपैकी **१५%** याप्रमाणे शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांना आळीपाळीने **(Rotation)** कार्यालयात बोलावून कार्यालयीन कामकाज करुन घेण्यात यावे. ज्या शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांना कार्यालयात उपस्थित राहणेपासून सूट मिळेल त्यांनी घरी राहून **(Work From Home)** कार्यालयीन काम करावे. रजेवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा यामध्ये समावेश करु नये. ( उपरोक्त संदर्भ क्रमांक ९ च्या आदेशामधील Annexure II - viii.)
२. संबंधित अधिविभाग प्रमुख / प्रशासकीय विभाग प्रमुख यांना परीक्षेच्या / इतर कार्यालयीन कामकाजासाठी उर्वरित शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांची सेवा आवश्यक वाटल्यास त्यानुसार त्यांनी संबंधित शिक्षक / अधिकारी / प्रशासकीय सेवकांना बोलाविल्यास त्यांनी कार्यालयात उपस्थित रहाणे अनिवार्य राहील. सर्व शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांनी कार्यालयास दिलेल्या त्यांच्या मोबाईल क्रमांकावर उपलब्ध रहावे.
३. उपरोक्त नुसार संबंधित विभाग प्रमुख यांनी विभागातील प्रत्येक शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवक हे आठवड्यात किमान एक दिवस कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी.
४. अधिविभाग / विभाग प्रमुख यांनी उपस्थित शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांची उपस्थित दिवस व कामाचे स्वरुप यांच्या नोंदी (रोस्टर) अद्यावत ठेवाव्यात.
५. प्रतिबंधित क्षेत्रात निवास असणाऱ्या शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांना कार्यालयीन कामकाजाकरिता बोलावू नये तसेच त्यांना घरी राहून (Work From Home) काम करण्याबाबत सूचना द्याव्यात. मात्र अशा सेवकांनी संबंधित विभागप्रमुख यांना या अनुपस्थितीबाबत लिखीत स्वरूपात ई - मेल किंवा इतर माध्यमाद्वारे अवगत करावे. ( Online / Distance learning shall continue to be permited and shall be encouraged )
६. अत्यावश्यक सेवा प्रदान करणारी कार्यालये (सुरक्षा विभाग, आरोग्य विभाग व अभियांत्रिकी इ. अंतर्गत असणारी अत्यावश्यक सेवा) पूर्ण क्षमतेने कार्यरत राहतील.
७. संबंधित विभाग प्रमुख यांनी रोजंदारी / हंगामी सेवकांना आस्थापना विभागाच्या पूर्व परवानगी शिवाय बोलाविण्यात येवू नये.
८. कार्यालयात उपस्थित राहणा-या सर्व शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवक यांनी शासनाने वेळोवेळी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेल्या तसेच उपरोक्त संदर्भ क्रमांक ११ नुसार या कार्यालयाच्या परिपत्रकातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.
९. सदर आदेश पुढील आदेश निर्गमित होई पर्यंत लागू राहतील.

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव

जा.क्र. आस्थापना/ 1236
दि. 31 JUL 2020
प्रति,

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, विभाग प्रमुख, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
२) सर्व उपकुलसचिव व समकक्ष अधिकारी, कायदा अधिकारी, सहा. कुलसचिव, समकक्ष अधिकारी व इतर प्रशासकीय अधिकारी.
३) जनसंपर्क अधिकारी कार्यालयास
४) मा.प्रभारी कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. प्रभारी संचालक , परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
५) समन्वयक, विद्यापीठ संकेतस्थळ कक्ष - यांना Intranet वर प्रसिध्द करण्यासाठी.